# 3. राजकीय पक्ष

लोकशाही राज्यपध्दतीत राजकीय पक्ष असतात. लोकशाहीत राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी जेव्हा लोक एकत्र येऊन निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात तेव्हा त्या संघटनांना 'राजकीय पक्ष' म्हटले जाते. राजकीय पक्ष म्हणजे निवडणूक लढवून ती जिंकण्यासाठी व त्यानंतर सत्ता मिळवून आपल्या पक्षाचे शासन स्थापन करणाऱ्या लोकांचा गट होय.

**राजकीय पक्ष : ठळक वैशिष्ट्ये**

१. **सत्ता मिळविणे :** राजकीय पक्षांचा हेतू केवळ निवडणुकांच्या माध्यमातून सत्ता मिळवणे हाच असतो. विविध राजकीय पक्ष परस्परांशी सतत स्पर्धा करत असतात परंतु स्पर्धेचे स्वरूप निकोप असावे.
२. **विचारसरणीचा आधार :** प्रत्येक राजकीय पक्षाची स्वतःची विशिष्ट विचारसरणी असते. सार्वजनिक प्रश्नांबाबत त्याची एक विशिष्ट भूमिका असते. ही विचारसरणी ज्यांना योग्य वाटते ते लोक त्या पक्षाला पाठिंबा देतात. पक्षाला लोकांचा जो पाठिंबा मिळतो त्याला त्या 'पक्षाचा जनाधार' असे म्हणतात.
३. **पक्ष कार्यक्रम:** आपली विचारसरणी प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय पक्ष त्यावर आधारित कार्यक्रम आखतात. सत्ता मिळाली की या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते. सत्ता न मिळाल्यास या कार्यक्रमाच्या आधारे लोकांचा पाठिंबा मिळविला जातो.
४. **सरकार स्थापन करणे:** ज्या पक्षांना बहुमत मिळत नाही ते पक्ष विरोधी पक्ष म्हणून काम करतात. राजकीय पक्ष सरकार स्थापन करतो. ज्यांना निवडणुकीत बहुमत मिळते ते राजकीय पक्ष सरकार स्थापन करतात व ज्यांना मिळत नाही ते विरोधी पक्ष म्हणून काम करतात.
५. **शासन व जनता यांच्यातील दुवा:** राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. जनतेच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य राजकीय पक्ष करतात. शासन पक्षामार्फत आपल्या ध्येय धोरणांना पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतात.

**भारतातील पक्ष पद्धतीचे बदलते स्वरूप:**

१. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस हा एकमेव पक्ष प्रबळ होता. त्याला केंद्र व राज्य पातळीवर बहुमत होते. म्हणून या काळातील पक्षपद्धतीला एक प्रबळ पक्ष पद्धती असे म्हणतात.

२. काँग्रेसला १९७७ मध्ये इतर पक्षांनी एकत्र येऊन आव्हान दिले.

३. १९८९ च्या लोकसभा निवडणुकांनंतर एकाच पक्षाचे वर्चस्व नष्ट झाले. त्यानंतर अनेक पक्ष एकत्र येऊन आघाडीचे शासन स्थापन करण्यास सुरुवात केली. आघाडी सरकार स्थापन करण्याचे प्रयोग भारतीय जनता पक्ष, काँग्रेस या दोन्ही पक्षांनी केले. आघाडी शासन ही गोष्ट भारतीय राजकारणात मान्यता पावली आहे.

**भारतातील काही राजकीय प्रमुख राजकीय पक्ष**

१. **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस:** १८८५ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापना झाली. स्थापनेच्या वेळी स्वातंत्र्याचा विषय महत्त्वाचा होता. त्यामुळे त्यात विविध विचार विचारसरणीचे गट एकत्र आले होते. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस
२. **भारतीय कम्युनिस्ट पक्ष:** - या पक्षाची स्थापना १९२५ मध्ये झाली. हा पक्ष मार्क्सवादी विचारसरणीवर आधारलेला आहे. मजूर, कष्टकरी वर्ग व कामगारांच्या हितासाठी हा पक्ष कार्य करतो. या पक्षाचा भांडवलशाहीला विरोध आहे. १९६० मध्ये या पक्षातील नेत्यांमध्ये वैचारिक मतभिन्नतेमुळे भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) १९६४ साली स्थापन झाला.
३. **भारतीय जनता पक्ष:-** भारतीय जनसंघ १९५१ मध्ये स्थापन झाला. १९७७ मध्ये जनता पक्ष स्थापन झाला. जनता पक्षात जनसंघ विलीन झाला पण हा पक्ष फुटला व १९८० मध्ये त्यातील भारतीय जनसंघाने ‘भारतीय जनता पक्ष’ हा नवीन पक्ष स्थापन केला. प्राचीन भारतीय संस्कृती व परंपरा यांचे जतन केले पाहिजे अशी या पक्षाची भूमिका आहे.
४. **भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) :-** समाजवाद, धर्मनिरपेक्ष, लोकशाही याचा हा पक्ष पुरस्कार करतो. कामगार, शेतकरी, शेतमजूर यांच्या हितसंबंधांची जपणूक करणे हे त्यांचे धोरण आहे.
५. **बहुजन समाज पक्ष :-** हा समाजवादी विचारणीचा पक्ष आहे. बहुजनांचे हित या पक्षाचे उद्दिष्ट आहे. १९८४ साली या पक्षाची स्थापना झाली. दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक यांचा या पक्षात सामावेश आहे. बहुजन समाजाला सत्ता मिळवून देणे हे या पक्षाचे उद्दिष्ट आहे.

६. **राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष:** १९९९ मध्ये या पक्षाची स्थापना झाली. मूळ पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडून हा पक्ष निर्माण झाला. लोकशाही, समता, धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर या पक्षाचा विश्वास आहे. १९९९ ते २०१४ पर्यंत काँग्रेसबरोबर युती करून हा पक्ष महाराष्ट्रात सत्तेवर आला.

७. **तृणमूल काँग्रेस** : तृणमूल काँग्रेसची स्थापना १९९८ मध्ये झाली. २०१६ मध्ये निवडणूक आयोगाने या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, दुर्बल घटकांचे संरक्षण हे या पक्षाचे धोरण आहे.

**प्रादेशिक पक्ष :** प्रादेशिक पक्षांचा प्रभाव त्या त्या प्रदेशा पुरता मर्यादित असतो. तरीही ते राष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडतात. प्रादेशिक पक्ष प्रादेशिक समस्यांना प्राधान्य देतात . सत्ता ही त्या प्रदेशातील व्यक्तीच्या हाती असावी. प्रशासनात व व्यवसायात त्या प्रदेशाच्या रहिवाशांना प्राधान्य दिले जावे असा आग्रह प्रादेशिक पक्ष धरतात.

**भारतातील प्रादेशिक पक्षांचे बदलते स्वरूप** :- स्वातंत्र्यानंतरच्या काळापासून भारतात प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व दिसते पण त्याच्या स्वरूपात व भूमिकेत बदल झाले आहेत. सुरुवातीच्या काळात प्रादेशिक पक्षांमधून काही फुटीर चळवळी निर्माण झाल्या. काहींना संघराज्यातून बाहेर पडून स्वतंत्र देश निर्माण करायचा होता. उदा : खलिस्थान , द्रविडस्थान.

* कालांतराने स्वतंत्र राज्याच्या मागणीऐवजी त्यांना अधिक स्वायत्तता मिळावी म्हणून प्रयत्न सुरू केले. या टप्प्याची सुरुवात १९९० नंतर झाली. आपल्या प्रदेशाच्या विकासासाठी राज्यात व केंद्रात सत्ता मिळावी म्हणून काही प्रादेशिक पक्ष निर्माण झाले. उदा :-शिवसेना, तेलगुदिसम.

भारतातील प्रादेशिक पक्षांचा प्रवास फुटीरता, स्वायत्तता व मुख्य राष्टीय प्रवाहात सामील होणे अशा टप्प्यांमधून झाला आहे. तसेच राष्ट्रीय राजकारणातही त्यांचा प्रभाव वाढला आहे. आघाडीचे शासन हा त्याचा परिणाम आहे.

**काही प्रमुख प्रादेशिक पक्ष :**

१. **शिवसेना-** महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष १९६६ मध्ये स्थापना. भूमिका मराठी माणसांच्या हक्कांची जपणूक, मराठी भाषेचे संवर्धन परप्रांतीयाना विरोध. १९९५ मध्ये भारतीय जनता पक्षाची युती १९९५, २०१४ मध्ये भाजपसोबत सत्तेवर. २०१९ मध्ये कॉग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेस सह महाविकास आघाडी करून.

२. **शिरोमणी अकालीदल-** पंजाबमधील प्रादेशिक पक्ष १९२० मध्ये स्थापना, धार्मिक, प्रादेशिक आस्मिता जोपासण्यास प्राधान्य.

३. **जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स :** काश्मीरमधील प्रमुख प्रादेशिक पक्ष १९३२ साली स्थापना. काश्मीरी जनतेच्या हितसंबंध पाठपुरावा.

४. **आसाम गण परिषद** -१९८५ मध्ये स्थापना. निर्वासितांचे प्रश्न सोडविणे, आसामचे सांस्कृतिक, भाषिक, सामाजिक वेगळेपणा जपणे, आर्थिक विकास करणे.

५. **द्रविड मुन्नेत्र कळहाम :** या पक्षाची स्थापना १९७२ मध्ये झाली. तामिळ आस्मिता जोपासण्याचे प्रयत्न. केंद्राच्या आघाडीतही काही काळ सहभाग. सत्तेत दीर्घकाळ राहिल्याने अनेक उपाययोजना राबवल्या.